शिका, संघटित व्हा, संघर्ष करा.

# प्रज्ञा

वर्ष दुसरे | अंक नऊवा | नोव्हेंबर 2025

डॉ. आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय येरवडा, पुणे चे वार्तापत्र

अध्यक्ष : श्री. आनंदराज आंबेडकर | उपाध्यक्ष : डॉ. दत्ता देशकर | सचिव : श्री. संजीव बोधनकर | प्राचार्य : डॉ. गौतम बनसोडे | संपादक : प्रा. सचिन गुळीग

संपादक मंडळ : डॉ. अनिल घोलप, प्रा. धीरज गडहिरे | विद्यार्थी प्रतिनिधी : स्नेहल कांबळे, रतन शिंदे

# महापरिनिर्वाण विशेष अंक

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



## संपादकीय


### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील शेवटचे दिवस

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आयुष्यातील शेवटचे दिवस अत्यंत मेहनती, धावपळीचे आणि मानसिक ताणाने भरलेले होते. 1954 नंतर त्यांची तब्येत खालावू लागली. मधुमेह, हृदयविकार, रक्तदाब अस्थिरता, तसेच सततचा निद्रानाश यामुळे त्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम झाला. डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला तरीही ते सामाजिक न्याय, संविधानिक प्रश्न आणि बौद्ध धर्माच्या अभ्यास-लेखनात अपार व्यस्त राहिले.
या काळात त्यांनी केलेले सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाची निर्मिती. हा ग्रंथ पूर्ण करणे ही त्यांची जणू जीवनाची शेवटची धडपड होती. प्रचंड अशक्तपणा असूनही ते दिवसरात्र लेखन करत होते. सहकारी आणि पत्नी सविता आंबेडकर यांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला, परंतु बाबासाहेबांना हा ग्रंथ समाजासाठी अत्यंत आवश्यक वाटत असल्याने ते अखंड परिश्रम करत राहिले.१४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी नागपूरच्या ऐतिहासिक दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांना बौद्ध धर्माची दीक्षा दिली. हा क्षण त्यांच्या जीवनातील सर्वात समाधानाचा होता. मात्र त्यानंतर त्यांची प्रकृती अचानक ढासळू लागली. थकवा, दमछाक, निद्रानाश वाढला. दिल्लीतील '२६ अलिपूर रोड' येथील निवासस्थानी ते शांतपणे लेखन व वाचन करत राहिले. देशातील राजकीय अस्थिरता, दलित समाजाची स्थिती आणि आर्थिक धोरणांबद्दल ते चिंतीत होते. ५ डिसेंबर १९५६ च्या रात्री ते नेहमीप्रमाणे आपल्या अभ्यासात मग्न होते. दीर्घकाळाच्या अति-परिश्रमांमुळे आणि अशक्त शरीरामुळे त्यांची तब्येत अचानक बिघडली. ६ डिसेंबर १९५६ रोजी पहाटे त्यांचे शांतपणे निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारत एका महासामाजिक क्रांतिकारकाला, तर संविधानाला त्याचा मुख्य शिल्पकार गमावला. मुंबईत झालेल्या त्यांच्या अंतिम यात्रेला लाखो लोकांनी भावपूर्ण निरोप दिला. बाबासाहेबांचे शेवटचे दिवस हे एका महामानवाने अखेरच्या श्वासापर्यंत समता, बंधुता आणि मानवमूल्यांसाठी केलेल्या अखंड संघर्षाचे प्रतीक ठरतात.

संपादक
प्रा. सचिन गुळीग
इतिहास विभाग
9545600535



महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस *संविधान दिन* म्हणून साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी उद्देशिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.



महाविद्यालयात ७ नोव्हेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन "विद्यार्थी दिन" म्हणून साजरा करण्यात आला.



महाविद्यालयात एकदिवसीय शिष्यवृत्ती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कनिष्ठ लिपिक श्री.सुरज कांबळे व समावेश फाऊंडेशन टीम (ऍक्शन इम्पॅक्ट फाऊंडेशन) यांच्या सहकार्यातून ही कार्यशाळा संपन्न झाली.



महाविद्यालयात महात्मा ज्योतिराव फुले यांचा 135वा स्मृतीदिन आदरपूर्वक साजरा करण्यात आला.



आज महाविद्यालयात "वंदे मातरम् " या गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त सामूहिक गाण घेण्यात आले

## शिक्षण : समाजपरिवर्तन आणि क्रांतीचे प्रभावी साधन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण आयुष्यात त्यांनी शिक्षणाला सर्वोच्च महत्व दिले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा उद्धाराचा राजमार्गच त्यांनी संपूर्ण भारतीयांना दिला होता. त्यांनी शिक्षणाला समाज परिवर्तनाचे व क्रांतीचे शक्तिशाली साधन मानले. त्यांच्या शैक्षणिक कार्याचे अनेक पैलु महत्वाचे ठरले आहेत. शिक्षणाला मूलभूत अधिकाराचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी शिक्षणविषयक तरतुदींना घटनात्मक संरक्षण मिळवुन देण्यासाठी त्यांनी महत्वाची कामगिरी बजाविली.

डॉ. आंबेडकर हे महान शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा, दलित वर्ग शिक्षण संस्था, पीपल्स एज्युकेशन सोसायटी अशा विधायक संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्व पटवुन दिले. शोषितवर्गाचे शिक्षण झाले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. देशातील विषमतेला नष्ट करणारा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण असल्याची ठाम भुमिका त्यांनी मांडली होती. शिक्षणामुळे मानवी मेंदू प्रगत होतो. ज्ञानाचा विस्तार होतो. बऱ्या-वाईटाची कल्पना प्रगत होते. शिक्षणामुळे सामाजिक उद्दिष्टांची परिपूर्ती करण्यासाठी व्यक्ती सामाजिक कर्तव्यांबाबत नेहमी सजग राहतो. शिक्षण म्हणजे सर्वसामान्यांचे प्रबोधन, संघटन म्हणजे जनसामान्यांचे संघटन आणि संघर्ष म्हणजे सर्वसामान्य माणसाने प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध पुकारायचे बंड होय. व्यक्तीला अन्यायाविरुद्ध उठाव करण्याचे सामर्थ्य आणि जाणीव केवळ शिक्षणामुळेच होत असल्याचा विश्वासही निर्माण करण्यात आला होता.

शिक्षणाने त्याग, मानवता, विनम्रता, दुसऱ्यांची जाणीव, नैतिकता अशी मानवी मूल्ये विद्यार्थी मनावर रुजविण्याची गरज निर्माण झाली होती. शिक्षणामुळे व्यक्तीची वैचारिक क्षमता वृद्धिंगत होणे गरजेचे ठरते. शिक्षणामुळे बौद्धिक, मानसिक क्षमतेचा, अनुभव कक्षेचा विकास व्हावा, शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वाला चालना मिळून व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला पाहिजे, यासाठी सतत महत्वाचे कार्य केले. जात, धर्म, लिंग, आर्थिक स्थिती यांवर आधारित भेदभावाचा अंत करुन प्रत्येक व्यक्तीला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा समान हक्क देण्यासाठी उत्तम कार्य करत शैक्षणिक संधी वाढवून राष्ट्रीय प्रगती साधण्याला डॉ. आंबेडकरांनी सतत प्राधान्य दिले होते.

डॉ.आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य हे तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, राजकारण आणि कायदा यांचा विलक्षण संगम आहे. त्यांनी केवळ शिक्षण घेतले नाही, तर शिक्षणाला क्रांतीचे साधन बनवून भारतातील लाखो लोकांचे जीवन बदलले. शिक्षण हे आमचे शस्त्र आहे, असा संदेश देऊन त्यांनी वंचित समाजात शिक्षणाबद्दल जागृती निर्माण केली. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वसतिगृहे आणि शैक्षणिक सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

डॉ. आंबेडकरांनी शिक्षण पद्धतीत सुधारणा करण्याला प्राधान्य दिले व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाला त्यांनी अधिक महत्व दिले. शिक्षणाने स्त्री-स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त होईल. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे त्यांनी संविधानिक तरतूद करून स्त्री-शिक्षण, अधिकार, स्त्री-संरक्षण यांना कायदेविषयक चौकट निर्माण केली व स्त्रीमुक्ततेचा मार्ग प्रशस्त केला. त्यामुळे आता स्त्री ही पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात अधिकार संपन्नता प्राप्त करत आहे. सामाजिक व राष्ट्रीय प्रगतीसाठी प्रभावीपणे शिक्षण कार्यरत असले पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी शिक्षण क्षेत्रासाठी केलेले कार्य सर्वांनी आत्मसात करुन त्याची सक्रियपणे अंमलबजावणी करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

प्रा.डॉ.राजू गुरव (भूगोल)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीचे कार्य

भारताच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे अत्यंत व्यापक आणि क्रांतिकारी मानले जाते. त्यांनी स्त्रियांना पुरुषांसमान हक्क मिळावेत, त्यांच्या जीवनमानात बदल घडावा आणि त्यांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे यासाठी आजीवन संघर्ष केला. स्त्रियांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य हे भारतीय समाजरचनेत मोठे परिवर्तन करणारे ठरले. भारतीय राज्यघटना तयार करताना बाबासाहेबांनी स्त्रियांच्या मूलभूत अधिकारांना सर्वोच्च स्थान दिले. स्त्रियांना समानता, स्वातंत्र्य, समान संधी, शिक्षण, रोजगार, संपत्तीवरील हक्क इ. अधिकार संविधानात समाविष्ट केले. त्यामुळे भारतीय स्त्रियांना कायदेशीररित्या पुरुषांसारखे समान स्थान मिळाले. हे स्त्रियांच्या अधिकार क्रांतीचे पहिले मोठे पाऊल होते.

बाबासाहेबांनी हिंदू कोड हिंदू कोड बिलामार्फत स्त्रियांच्या सामाजिक आणि कौटुंबिक जीवनात अनेक मूलभूत बदल घडवून आणले. यामुळे स्त्रियांना संपत्तीतील समान हक्क, घटस्फोटाचा अधिकार, दत्तक घेण्याचा हक्क, पती-पत्नीच्या संबंधातील न्याय्य अधिकार असे अनेक कायदेशीर हक्क मिळाले. त्या काळातील पुरुषप्रधान समाज व्यवस्थेला हे मान्य नसल्याने मोठा विरोध झाला, परंतु स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी बाबासाहेबांनी तडजोड न करता ठाम भूमिका घेतली. या कायद्यामुळे भारतीय स्त्रियांचे जीवन अधिक सुरक्षित आणि स्वावलंबी बनले. स्त्री शिक्षणाच्या प्रसारासाठी देखील त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. स्त्रियांनी शिक्षण घेतल्याशिवाय समाजाची प्रगती होऊ शकत नाही, हे त्यांनी स्पष्ट सांगितले. त्यांचा “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा” हा संदेश स्त्रियांसाठीही तितकाच लागू होता. कामगार स्त्रियां बद्दलही बाबासाहेब अत्यंत संवेदनशील होते. त्यांनी कामगार कायदे तयार करताना स्त्रियांच्या सुरक्षिततेवर, आरोग्यावर, योग्य वेतनावर आणि मातृत्व संरक्षणावर भर दिला. कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या स्त्रियांच्या कामाच्या तासांमध्ये घट, रात्रपाळी बाबतचे नियम, मातृत्व रजा अशा अनेक सुधारणा त्यांनी केल्या. यामुळे कामगार स्त्रियांचे जीवनमान सुधारले आणि त्यांना सन्मानाने काम करण्याचे वातावरण उपलब्ध झाले.

याशिवाय बाबासाहेबांनी समाजातील अनेक स्त्री विरोधी रूढी, प्रथा जसे की बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवा अत्याचार, आणि स्त्रियांवरील सामाजिक बंधनांचा निषेध केला. त्यांचा ठाम विश्वास होता की स्त्रीची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती. त्यामुळे त्यांनी स्त्रियांनी स्वतःची ओळख निर्माण करावी, स्वावलंबी बनावे, आणि समाजात समानतेचा हक्क मिळवावा यासाठी सतत जनजागृती केली.एकंदरीतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीचे कार्य हे भारतीय समाजासाठी अत्यंत परिवर्तनशील ठरले. त्यांनी स्त्रियांना केवळ कायदेशीर हक्कच दिले नाहीत, तर आत्मसन्मान, स्वातंत्र्य आणि प्रगतीचा मार्गही दाखवला. आज भारतीय स्त्रियांना मिळालेला अधिकार, स्वातंत्र्य आणि स्थान हे बाबासाहेबांच्या दूरदृष्टीचे आणि अथक संघर्षाचे फलित आहे. बाबासाहेबांच्या विचारातून, भाषणातून, लेखनात, कार्यामध्ये पदोपदी आपल्याला आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीची बीजे सापडतात.त्यांचे कार्य हे स्त्री मुक्तीच्या लढ्याचे मजबूत आधारस्तंभ आहे. म्हणूनच आजच्या काळातील स्त्री संघटना बाबासाहेबांना स्त्री मुक्ती चळवळीचे प्रेरणादाते समजतात.

लेखिका
डॉ. वर्षा वाघमारे
(इतिहास विभाग)



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक विलक्षण वकील आणि न्यायदूत

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व हे अनेक पैलूंनी उज्वल आणि संपन्न होते. ते समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ, शिक्षक, तत्त्वज्ञ, संविधानकार अशा विविध भूमिकांनी परिचित आहेत; परंतु त्यांच्या जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची वकील म्हणून असलेली अपूर्व कामगिरी. न्याय, समता, बंधुता आणि मानवी हक्कांचा आवाज बनून त्यांनी भारतीय न्यायव्यवस्थेला नवे स्वरूप दिले.

आंबेडकरांचे बालपण अत्यंत कठीण परिस्थितीत गेले. अस्पृश्यतेच्या विळख्यात अडकलेल्या समाजातून आलेल्या या मुलाने शिक्षणाच्या बळावर जग जिंकावे, असे कुणालाच वाटले नव्हते. परंतु त्यांच्या अंगी असलेली जिद्द, अभ्यासू वृत्ती, आणि कायद्याचा शोध घेण्याची उत्कटता यांनी त्यांना जगातील सर्वोच्च विद्यापीठांत नेले. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि ग्रे’ज इन येथे त्यांनी कायद्याचे आणि अर्थशास्त्राचे उच्च शिक्षण घेतले. ग्रे’ज इनमधून बॅरिस्टर झाल्यावर भारतात परतताना ते केवळ वकील नव्हते, तर ते न्यायाचा जागतिक दूत बनून येत होते.

बाबासाहेबांचा वकिली व्यवसाय हा केवळ उपजीविकेचे साधन नव्हता. ते न्यायाला स्वतःचे धर्म मानत. त्यांची पहिली लढाई अगदी प्रारंभीपासूनच सामाजिक अन्यायाविरुद्ध होती. ते वकील झाल्यानंतर त्यांनी शोषित, वंचित आणि अत्याचारित लोकांच्या हक्कांसाठी न्यायालयात शब्दाने आणि तत्वज्ञानाने लढा दिला.

त्यांच्या वकिलीतील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कायद्याचे तत्त्व, घटनात्मक मूल्ये आणि नैतिकता यांचे अद्वितीय मिश्रण. त्यांना कायदा हा केवळ धारांची भाषा नसून, तो समाजाचे आरसे आहे, हे स्पष्ट ठाऊक होते.

१९२०च्या दशकात त्यांनी अनेक ऐतिहासिक खटल्यांमध्ये बाजू मांडली. त्यात कामगार हक्क, वेतन, सामाजिक भेदभाव, निवडणूक हक्क, पाणी व सार्वजनिक स्थळांवरील प्रवेश, हे मुद्दे अग्रस्थानी होते. ते जेव्हा न्यायालयात उभे राहत, तेव्हा त्यांचे भाषण, न्यायवाद, पुरावे मांडण्याची पद्धत, आकडेवारीचा वापर आणि तर्कशक्ती हे सर्व जणांना थक्क करीत.

त्यांनी कामगारांच्या ८ तासांच्या कामकाजाचा दिवस, समान वेतन, मातृत्व संरक्षण, आणि सुट्टी यांसारख्या अनेक कल्याणकारी सुधारणांसाठी भूमिका बजावली. कायदा आणि मानवी हक्क कसे जोडले जातात, हे त्यांनी भारतीय न्यायव्यवस्थेला शिकवले. वकिली करताना ते केवळ केस जिंकण्यावर भर देत नसत; तर समाजातील अन्यायाची मुळे तोडणे हा त्यांचा ध्यास होता. त्यामुळेच त्यांनी 'मुकनायक' आणि ‘बहिष्कृत भारत’ सारख्या वृत्तपत्रांद्वारे कायद्याबद्दल जागृती केली. त्यांच्या लेखणीतून आणि वकिलीतील विचारांतून दिसून येणारे वैशिष्ट्य म्हणजे - न्याय केवळ विशिष्ट वर्गासाठी नसून प्रत्येक मानवासाठी असला पाहिजे.

आंबेडकरांनी दलितांच्या नागरी हक्कांसाठी अनेक न्यायालयीन पेटिशन्स दाखल केल्या. महाड सत्याग्रहादरम्यान त्यांनी उचललेली "मनुष्य जन्माने नव्हे तर कृतीने महान" ही भूमिका ही न्यायव्यवस्थेतील समतेची पायरी होती. त्यांच्या या संघर्षामुळे भारतात सामाजिक न्यायाची नवी हवा निर्माण झाली. वकिलीचा अनुभव आणि समाजातील वास्तव यांचा त्यांनी मिळून केलेला अभ्यास हा पुढे भारतीय संविधानाच्या निर्मितीत महत्वाचा ठरला. वकील म्हणून त्यांनी शिकलेली कायद्याची व्याप्ती, न्याय, समता, हक्क, जबाबदाऱ्या आणि शासनव्यवस्थेची समज ही संविधान निर्मितीचे प्रमुख स्तंभ ठरली.

म्हणूनच त्यांनी संविधानात मूलभूत हक्क, धर्मस्वातंत्र्य, सामाजिक न्याय, आणि सकारात्मक भेदभावाची तरतूद केली. ते भारतीय न्यायव्यवस्थेचे शिल्पकार म्हणून गौरवले जातात. आंबेडकर वकील म्हणून अत्यंत प्रामाणिक, कठोर परिश्रमी आणि प्रखर बुद्धिमत्तेचे होते. त्यांच्या मते "मनुष्याची प्रगती कायद्याच्या योग्य वापरानेच शक्य होते." वकील हा समाजातील केवळ एक व्यावसायिक घटक नसून तो न्याय आणि नैतिकतेचा रक्षक असतो, असा त्यांचा विश्वास होता.

वकील म्हणून त्यांनी भारताला एक नवी विचारधारा दिली — कायद्यापुढे सर्व समान. त्यांनी सांगितले की, न्यायालय हे दुर्बलांचे सर्वात सुरक्षित ठिकाण असले पाहिजे. त्यांची वकिली केवळ कायदेशास्त्रापुरती मर्यादित नव्हती, तर ती मानवी गौरव आणि सामाजिक परिवर्तनाची आधारभूत शक्ती होती. आजच्या न्यायालयांत, कायद्याच्या महाविद्यालयांत आणि धोरणव्यवस्थेत त्यांना सर्वश्रेष्ठ प्रेरणास्थान मानले जाते. वकिली हा व्यवसाय तेव्हाच पवित्र ठरतो, जेव्हा तो मानवतेसाठी उपयोगी होतो — हे तत्त्व त्यांनी जगाला दाखवून दिले. त्यांचा संपूर्ण वकिली प्रवास म्हणजे धैर्य, तर्क, विवेक, अभ्यास आणि मानवी मूल्यांचा संगम होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वकील म्हणून केवळ प्रगतिशील नव्हते; तर ते भविष्यातील न्यायव्यवस्थेचे दिशादर्शक होते. त्यांनी कायदा आणि न्याय यांना मानवतेच्या केंद्रस्थानी ठेवत समाजाला नवे भान दिले. आज भारतात न्याय, समता आणि हक्कांविषयी जेवढी जागरूकता आहे, त्यामागे त्यांच्या विचारांचा पाया आहे.

अशा या महान वकिलाला, संविधान शिल्पकाराला आणि न्यायाच्या सूर्याला माझे हजारो प्रणाम.

प्रा. धीरज गडहिरे
वाणिज्य विभाग



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची " शेअर ब्रोकर्स" फर्म

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१७ मध्ये शिक्षण पूर्णकरून परतल्यानंतर, अर्थशास्त्राच्या सखोल ज्ञानातून, दलाल स्ट्रीटजवळ, मुंबईत "स्टॉक अँड शेअर ब्रोकर्स" ही फर्मस्थापन केली. त्यांची अतुलनीय बुद्धिमत्ता आणिपात्रता असूनही, व्यापक सामाजिक पूर्वग्रहामुळे ही फर्मअपयशी ठरली, कारण त्यांच्या "अस्पृश्य" जातीमुळे कोणीही त्यांच्याशी संबंध ठेवण्यास तयार नव्हते. या उपक्रमातून त्यांना आर्थिक बाजारपेठेबद्दल आणित्यांना येणाऱ्या सामाजिक अडथळ्यांबद्दलची त्यांची लवकर समज अधोरेखित होते.

- आंबेडकरांचा उपक्रम: पदवी मिळवल्यानंतर, डॉ. आंबेडकरांनी भारताच्या आर्थिक जिल्ह्याच्या मध्यभागी, मुंबई येथे एक स्टॉक आणिशेअर ब्रोकरेज फर्मस्थापन केली.
- फर्मचा उद्देश: हा एक दूरदर्शीव्यवसाय होता ज्या काळात अनेकांना अजूनही आर्थिक साक्षरता आणिशेअर बाजाराची उपलब्धता नव्हती.
- सामाजिक अडथळा: त्याची फर्मही त्याच्यासाठी अगम्य असलेल्या वित्तपुरवठ्याच्या जगात एक महत्त्वपूर्णपाऊल होते, तरीही प्रचलित सामाजिक भेदभावामुळे ती अयशस्वी झाली. त्याच्या जातीवर आधारित पूर्वग्रहामुळे क्लायंट आणिदलाल त्याच्यासोबत व्यवसाय करू शकले नाहीत, जरी तो तज्ञ होता.
- त्यांच्या दूरदृष्टीचा पुरावा: हा अयशस्वी उपक्रम प्रचंड सामाजिक पूर्वग्रहांशी झुंजत असतानाही, वित्तीय बाजारपेठा आणिगुंतवणुकीचे महत्त्व त्यांनी लवकर ओळखले होते हे अधोरेखित करतो.

त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी मुंबईतील दलाल स्ट्रीटजवळ “स्टॉक अॅण्ड शेअर्स” नावाची एक स्टॉक आणिशेअर दलालीची कंपनी सुरू केली होती, परंतु हा उपक्रम अपयशी ठरला. कोलंबिया विद्यापीठ आणिलंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून प्राप्त केलेल्या त्यांच्या उत्तम शैक्षणि क पात्रता असूनही, समाजातील जातीय पूर्व ग्रहांमुळे ग्राहक त्यांच्याशी व्यावसायि क संबंध ठेवण्यास तयार नव्हते. स्टॉकब्रोकि फर्मचे तपशील

- स्थान: कार्या लय दलाल स्ट्रीटजवळ होते, जि थे आज बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज आहे.
- नाव: फर्मचे नाव “स्टॉक अॅण्ड शेअर्स र्स” असे होते.
- कालावधी: नेमके वर्ष र्ष माहि त नाही, परंतु हा उपक्रम आंबेडकरांच्या वीसाव्या वर्षा त झाला होता.
- परिणाम: त्या काळातील जातीय व्यवस्था आणि पूर्व ग्रहांमुळे लोक त्यांच्याशी व्यवहार करण्यास तयार नसल्याने ही फर्म र्म अपयशी ठरली.

प्रा. अविनाश तायडे
(अर्थशास्त्र विभाग)



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला विषयक कार्य

भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती शतकानुशतके दुय्यम राहिली होती. शिक्षण, संपत्ती, विवाह, घटस्फोट, पुनर्विवाह, राजकीय सहभाग या सर्व क्षेत्रांत स्त्रियांना समान हक्क नव्हते. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री स्वातंत्र्याला सामाजिक क्रांतीचे केंद्र मानले. त्यांच्या मते, "स्त्रीची प्रगती ही समाजाच्या प्रगतीची पहिली अट आहे." महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेले कार्य हे भारतीय इतिहासातील सर्वात व्यापक आणि क्रांतिकारी योगदान मानले जाते. शिक्षण हे मुक्तीचे साधन आहे, तसेच आंबेडकरांनी स्त्री-शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे मुख्य शस्त्र मानले. त्यांनी सांगितले की, शिक्षणामुळे स्त्रीला आत्मसन्मान मिळतो. आर्थिक स्वावलंबनाची दारे उघडतात, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांचे बंधन तुटतात. त्यांनी समाजातील महिलांना शिक्षण घेण्याचे आवाहन केले. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हे स्त्रियांसाठीही तितकेच लागू होते.

**सामाजिक सुधारणांमध्ये महिलांसाठी लढा**

विधवा पुनर्विवाह, बालविवाह, बहुपत्नीत्व यांना विरोध करून आंबेडकरांनी हिंदू समाजातील स्त्रीविरोधी प्रथा उघडपणे मांडल्या. त्यांच्या मते: बालविवाहामुळे स्त्रीचे आरोग्य, शिक्षण आणि स्वातंत्र्य नष्ट होते. बहुपत्नीत्व ही स्त्रीचा अपमान करणारी व्यवस्था आहे. विधवांना पुनर्विवाहाचा हक्क असला पाहिजे.

**अस्पृश्य स्त्रियांच्या शोषणाविरुद्ध आवाज**

दलित स्त्रिया दुहेरी शोषणाला बळी पडत होत्या. जात आणि लिंग आंबेडकरांनी त्यांच्या सुरक्षिततेसाठी, सन्मानासाठी आणि हक्कांसाठी अनेक चळवळी केल्या.

**संविधान निर्मितीत महिलांसाठी केलेले ऐतिहासिक योगदान**

भारतीय संविधानात महिलांना समान हक्क मिळावेत यासाठी आंबेडकरांनी निर्णायक भूमिका बजावली. समानता व मूलभूत हक्क संविधानातील कलम १४, १५, १६, २१ इत्यादी कलमांमुळे महिलांना मिळाले: कायद्यापुढे समानता, भेदभावाविरुद्ध संरक्षण, समान संधी, जीवन व स्वातंत्र्याचा हक्क, मातृत्व संरक्षण कलम ४२ अंतर्गत महिलांना प्रसूतीसंबंधी संरक्षण देण्याची तरतूद आहे. हे भारतातील कामगार महिलांसाठी मोठे पाऊल होते. राजकीय हक्क आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळे महिलांना, मतदानाचा हक्क, निवडणूक लढवण्याचा हक्क, सार्वजनिक पदांवर काम करण्याचा हक्क मिळाला. हिंदू कोड बिल, भारतीय स्त्री-स्वातंत्र्याचा टर्निंग पॉइंट डॉ. आंबेडकरांचे सर्वात मोठे आणि क्रांतिकारी कार्य म्हणजे हिंदू कोड बिल. हिंदू कोड बिलचे उद्दिष्ट या विधेयकाद्वारे महिलांना मिळणार होते. संपत्तीतील समान हक्क, विवाहातील समानता, घटस्फोटाचा हक्क, दत्तक घेण्याचा हक्क, पती-पत्नी दोघांनाही समान वारसाहक्क, समाजातील विरोध, रूढीवादी शक्तींनी या विधेयकाला तीव्र विरोध केला. पण आंबेडकरांनी ठामपणे सांगितले: "मी हिंदू समाजाचे पुनरुज्जीवन नव्हे, तर त्याचे पुनर्रचना करीत आहे." हिंदू कोड बिल मंजूर न झाल्याने त्यांनी कायदामंत्रिपदाचा राजीनामा दिला. हा राजीनामा स्त्री-हक्कांसाठी दिलेला इतिहासातील सर्वात मोठा त्याग मानला जातो. बौद्ध धम्म आणि स्त्री स्वातंत्र्य आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारताना स्त्री-समतेला केंद्रस्थानी ठेवले. बौद्ध धम्मातील स्त्री-समता बौद्ध धम्मात, स्त्री-पुरुष समान, स्त्रीला भिक्षुणी होण्याचा हक्क, नैतिक, सामाजिक, आध्यात्मिक समानता आंबेडकरांच्या नवबौद्ध चळवळीत महिलांचा सहभाग, नवबौद्ध चळवळीत हजारो महिलांनी सहभाग घेतला. त्यांनी शिक्षण, संघटन, सामाजिक कार्यात मोठे योगदान दिले. महिलांसाठी आंबेडकरांचे विचार स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे फक्त कायदेशीर हक्क नव्हे. त्यांच्या मते स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे, आर्थिक स्वावलंबन, शिक्षण, आत्मसन्मान, सामाजिक सुरक्षा, राजकीय सहभाग, स्त्री ही समाजाची परिवर्तन, आंबेडकरांनी स्त्रीला समाजातील परिवर्तनाची वाहक मानले. त्यांच्या मते, स्त्री शिक्षित झाली तर संपूर्ण समाज शिक्षित होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला विषयक कार्य हे भारतीय इतिहासातील सर्वात व्यापक, क्रांतिकारी आणि दूरदर्शी योगदान आहे. त्यांनी स्त्रीला मानवी हक्क, सामाजिक सन्मान, आर्थिक स्वातंत्र्य आणि कायदेशीर संरक्षण मिळवून दिले. आज भारतीय स्त्री ज्या अधिकारांसह जगते, त्यामागे आंबेडकरांचे अथक परिश्रम, संघर्ष आणि दूरदृष्टी आहे.

**प्रा. मंजूषा निगडे**
**(वाणिज्य विभाग)**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांचे आर्थिक विचार

मानवजातीच्या इतिहासात आर्थिक शोषण, विषमता आणि अन्याय ही सर्वात मोठी सामाजिक समस्या राहिली आहे. भांडवलशाही असो वा सामंती व्यवस्था, काहींच्या हातात संपत्ती व उत्पादनसाधनांची मक्तेदारी असताना बहुसंख्य जनता शोषित व वंचित राहते. या असमानतेला समाप्त करण्यासाठी दोन महान विचारवंतांनी शतकानुशतके प्रभाव टाकला—कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर. दोन्ही विचारवंतांनी मानवमुक्ती, सामाजिक न्याय आणि आर्थिक समता यांचा मार्ग मांडला, पण दोघांच्या दृष्टिकोनाची पायाभूमी वेगळी होती. या संशोधन लेखाच्या माध्यमातून कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या आर्थिक विचारांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. कार्ल मार्क्सचे विचार भांडवलशाही व्यवस्था, उत्पादनसंबंध आणि वर्गसंघर्ष या संकल्पनांवर केंद्रित आहेत. मार्क्सनुसार समाजाचा पाया आर्थिक व्यवस्था ठरवते आणि इतिहास हा वर्गांतील संघर्षांचा इतिहास आहे. भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादनसाधनांवर भांडवलदार वर्गाचे नियंत्रण असते, तर कामगार वर्ग मजुरीवर अवलंबून असतो. कामगार उत्पादनामध्ये जे मूल्य निर्माण करतो त्यातील मोठा हिस्सा भांडवलदार आपल्या ताब्यात ठेवतो; यालाच मार्क्सने अधिक मूल्य (Surplus value) म्हटले. मार्क्सच्या मते आर्थिक शोषण बंद करण्याचा मार्ग म्हणजे प्रोलेटेरियन क्रांती. कामगार वर्गाने भांडवलदारांचा पराभव करून उत्पादनसाधने सामूहिक मालकीची करावीत आणि वर्गविरहित, साम्यवादी समाज निर्माण करावा. त्यासाठी धर्म, राष्ट्रवाद यासारख्या संकल्पना कामगारांना भ्रमित करणाऱ्या असल्याचे मार्क्स मानतो. मार्क्सवादाचा केंद्रबिंदू "आर्थिक परिवर्तनातून सामाजिक परिवर्तन साध्य होते." तर भारतीय सामाजिक संरचनेत आर्थिक प्रश्नाचा केंद्रबिंदू जातीव्यवस्था आहे, असा आंबेडकरांचा ठाम निष्कर्ष आहे. भारतातील शोषित वर्ग फक्त आर्थिकदृष्ट्या नव्हे तर धार्मिक, सामाजिक आणि मानसिकदृष्ट्याही गुलाम बनवला गेलेला आहे. त्यामुळे केवळ आर्थिक क्रांती होऊन शोषणाचा अंत होणार नाही; सामाजिक क्रांतीशिवाय आर्थिक मुक्ती अपूर्ण आहे, असे आंबेडकरांचे मत होते. आंबेडकरांनी राज्य नियंत्रित लोकशाही अर्थव्यवस्था (State Socialism) मांडली. जमिनीचे आणि उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, उत्पादनाचे न्याय्य वितरण, सार्वजनिक क्षेत्राचा विस्तार आणि कामगारांचा आर्थिक व सामाजिक संरक्षण या बाबींवर त्यांनी भर दिला. ८ तासांचा कामाचा दिवस, कठोर कामगार कायदे, पेन्शन, विमा, मातृत्व संरक्षण यांसाठी त्यांनी लढा दिला. डॉ. आंबेडकर हे आर्थिक विकासात शिक्षण, विज्ञान, औद्योगिकीकरण आणि समान संधी अत्यावश्यक मानतात. तसेच, सामाजिक नैतिकता आणि बंधुता यासाठी त्यांनी बौद्धधर्माचा स्वीकार करून आर्थिक मुक्ती आणि आध्यात्मिक मूल्यांचा संगम साधण्याचा संदेश दिला. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्याही विचारांमध्ये समानता म्हणजे शोषणाचा विरोध, मानवमुक्ती आणि समानतेचा आग्रह, परंतु त्या ध्येयापर्यंत जाण्याचे मार्ग वेगळे आहेत.

**मार्क्सवाद आणि आंबेडकरवादातील मूलभूत भेद:**

मार्क्सवादानुसार आर्थिक व्यवस्थेचे परिवर्तन झाले की समाज आपोआप बदलतो. परंतु आंबेडकरांच्या मते भारतातील समाजरचना जातिव्यवस्थेच्या सांस्कृतिक साखळ्यांनी वेढलेली असल्याने सर्वप्रथम सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन करणे अनिवार्य आहे. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान अन्यायाच्या सर्व रूपांविरुद्ध सर्वांगीण संघर्ष आहे, तो केवळ वर्गसंग्रामापुरता मर्यादित नाही. तसेच कार्ल मार्क्सने जगातील अनेक देशांमध्ये समाजवादी-क्रांतिक विचारांना दिशा दिली; कामगार चळवळी आणि संघटनांना सशक्त केले. डॉ. आंबेडकरांनी भारतात सामाजिक न्यायावर आधारित आर्थिक धोरणे, कामगार कायदे, आरक्षण व्यवस्था आणि संविधानिक हमी यांच्याद्वारे वंचित समुदायांच्या जीवनात क्रांतिक परिवर्तन घडवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स या दोघांचेही आर्थिक विचार मानवमुक्तीच्या दिशेनेच वाटचाल करतात. मार्क्सचा मार्ग आर्थिक क्रांतीतून सामाजिक समानता साधण्याचा आहे, तर आंबेडकरांचा मार्ग सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक समानतेतून मानवी मुक्तीकडे नेणारा आहे. भारतीय परिस्थितीचा विचार करता आंबेडकरांचे विचार अधिक वास्तववादी, व्यापक आणि मानवी मूल्यांना साजेसे जाणवतात. म्हणून भारतीय संदर्भात आंबेडकरवाद हा मार्क्सवादाचा पर्याय नव्हे, तर त्याहून मोठा व अधिक समग्र मानवी मुक्तीचा दृष्टिकोन आहे.

**प्रा. रिमा खरे**
**(इतिहास विभाग)**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा आढावा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपण प्रामुख्याने संविधान निर्माता, सामाजिक सुधारक आणि मानवतावादी विचारवंत म्हणून ओळखतो. परंतु त्यांची खरी ओळख एक उत्कृष्ट अर्थतज्ज्ञ म्हणूनही तितकीच महत्त्वाची आहे. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील त्यांचे उच्च शिक्षण, चलनव्यवस्था, कृषी अर्थव्यवस्था, सार्वजनिक वित्त, औद्योगिकीकरण आणि नियोजन यावरील त्यांचे संशोधन आजही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी मार्गदर्शक ठरते.

**चलनव्यवस्था आणि वित्तीय स्थैर्य**

डॉ. आंबेडकर यांनी त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथ "The Problem of the Rupee" मध्ये भारतातील चलनव्यवस्थेतील त्रुटींचा सखोल अभ्यास केला. त्यांनी गोल्ड स्टँडर्ड आणि स्थिर चलनव्यवस्थेची वकिली केली. चलनफुगवटा रोखण्यासाठी स्वतंत्र आणि वैज्ञानिक पद्धतीने चलननिर्मिती होणे

आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या शिफारशींवर आधारितच नंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) स्थापन करण्यात आली.

**कृषी अर्थव्यवस्था आणि जमीन सुधारणा**

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्रातील समस्यांवर आंबेडकरांनी अत्यंत वास्तववादी उपाय सुचवले. त्यांनी जमिनीचे तुकडीकरण थांबवून मोठ्या प्रमाणात शेती (Consolidation of Holdings) करण्यावर भर दिला, जेणेकरून उत्पादनक्षमता वाढेल. शेतकऱ्यांना कर्जाच्या जाळ्यातून मुक्त करण्यासाठी कर्जव्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण आणि शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र बँकिंग प्रणालीची गरज त्यांनी मांडली. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान, सिंचन आणि सहकारी संस्था यांचा वापर वाढवण्यावर त्यांनी भर दिला.


**औद्योगिकीकरण आणि आर्थिक विकास**

आंबेडकरांचे मत होते की भारताचा विकास केवळ कृषीवर अवलंबून राहून शक्य नाही. त्यांनी जलद औद्योगिकीकरण हे भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याचे मुख्य साधन मानले. मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण करून त्यांना सार्वजनिक क्षेत्रात ठेवण्याची शिफारस केली, जेणेकरून संसाधनांचे न्याय्य वितरण होईल. त्यांनी कामगारांच्या हक्कांसाठी किमान वेतन, कामाचे तास, सामाजिक सुरक्षा यांसारख्या धोरणांची पायाभरणी केली.

**सार्वजनिक वित्त आणि करव्यवस्था**

डॉ. आंबेडकर यांनी वित्तीय संघराज्याचे तत्त्व स्पष्ट करताना केंद्र आणि राज्य सरकारांनी स्वतःचे उत्पन्न स्रोत असावेत असे सांगितले. करव्यवस्था न्याय्य, प्रगतिशील आणि सामाजिक समतेला पूरक असावी, असे त्यांचे मत होते. त्यांनी सार्वजनिक खर्चात शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक कल्याण यांना प्राधान्य देण्याची गरज मांडली.

**प्रा. कैलास शिंदे**
**अर्थशास्त्र विभाग**



## "संविधानाचे शिल्पकार आणि स्त्रीस्वातंत्र्याचे पहारेकरी—डॉ. आंबेडकर"

भारतीय समाजातील स्त्रियांची स्थिती उंचावण्याच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान इतिहासात अढळ आहे. बॅरिस्टर होऊन भारतात परतल्यानंतर बाबासाहेबांनी स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व कायदेशीर हक्कांसाठी केलेले कार्य हे केवळ सुधारणा नव्हे तर भारतीय स्त्रियांच्या स्वाभिमानाचा पाया ठरले. कायद्यातील त्यांच्या सखोल ज्ञानाने भारतीय स्त्रियांना न्याय, समानता आणि स्वातंत्र्य मिळवून देण्याचा पाया घातला.

**1. बॅरिस्टर पदवी आणि न्यायदृष्टीचा पाया**

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि ग्रेज इन येथे शिक्षण घेताना बाबासाहेबांच्या विचारसरणीला आधुनिक न्यायतत्त्वज्ञानाची दिशा मिळाली. इंग्लिश कॉमन लॉ, फॅमिली लॉ आणि संविधानवादाचा अभ्यास केल्यानंतर स्त्रियांच्या अधिकारांविषयीची त्यांची संवेदनशीलता आणखी बळकट झाली. भारतात परतल्यावर त्यांनी सामाजिक असमानता संपवण्यास कायद्यालाच केंद्रस्थान दिले.

**2. मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमधील महिलांसाठी कायद्याची सुरुवात (1927–1937)**

बाबासाहेब 1927 मध्ये मुंबई प्रांतिक विधान परिषदेत नियुक्त झाले. याच काळात त्यांनी महिलांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला.

**(अ) मातृत्व लाभ कायदा**

प्रसूतिमुळे नोकरी जाण्याचा धोका आणि वेतन बंद होण्याची सक्ती या अमानुष प्रथांना बाबासाहेबांनी तीव्र विरोध केला. त्यांचे भाषण त्या काळातील स्त्रियांसाठी धाडसी घोषणेसारखे होते—

"Any society that does not protect its mothers can never progress."

त्यांच्या प्रयत्नांमुळे मातृत्वाच्या काळात आर्थिक सुरक्षा व महिला कामगारांची प्रतिष्ठा यासाठी कायदेशीर संरक्षणाचा मार्ग मोकळा झाला.

**(ब) कारखान्यातील महिलांचे श्रम-हक्क**

बाबासाहेबांनी महिलांसाठी कामाचे तास मर्यादित करणे, रात्रीच्या शिफ्टमध्ये संरक्षणाची तरतूद आणि समान वेतनाचा मुद्दा परिषदेपुढे जिद्दीने मांडला. त्या काळात ही विचारधारा क्रांतिकारक होती.

**3. "मंदिर प्रवेश" आणि स्त्रियांची सामाजिक समानता**

स्त्रियांना अस्पृश्यांप्रमाणेच अनेक धार्मिक-सामाजिक बंधने होती. 1930 च्या दशकात झालेल्या काळवा (महाड) आंदोलनात स्त्रियांनी शेकडोंनी सहभाग घेतला. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या नेतृत्वाला दिलेला प्रोत्साहन हा भारतीय स्त्री-मुक्ती चळवळीचा अविभाज्य भाग आहे.

**4. स्वातंत्र्यानंतर – संविधानप्रमुख म्हणून महिलांसाठी मजबूत कायदेशीर ढांचा**

भारताच्या संविधाननिर्मितीमध्ये बाबासाहेबांनी स्त्री-पुरुष समानता केंद्रस्थानी ठेवली. त्यांच्या प्रयत्नांमुळे महिलांचे अधिकार संविधानात पुढीलप्रमाणे दृढ झाले:

(अ) समानतेचा अधिकार – Article 14, 15 लिंगावर आधारित भेदभावास स्पष्ट बंदी.

(ब) समसमान संधी – Article 16 स्त्रियांना शासकीय नोकरीत समान संधी.

(क) मानवी प्रतिष्ठा – Article 21 शारीरिक, मानसिक आणि सामाजिक प्रतिष्ठेला संविधानिक संरक्षण.

(ड) अनुच्छेद 39 (a)(d) – Directive Principles स्त्रियांसाठी समान वेतन आणि उपजीविकेची निश्चित सुरक्षा.

हे तरतुदी आजच्या महिला कायद्यांचे मूळ बीज मानले जातात.

**5. हिंदू कोड बिल—भारतीय महिलांच्या स्वातंत्र्याचा खरा टप्पा**

बॅरिस्टर आंबेडकरांचे सर्वात मोठे कायदेशीर योगदान म्हणजे हिंदू कोड बिल (1947–1951).

या बिलामुळे स्त्रियांना प्रथमच कायदेशीर मान्यता मिळाली—

वारसाहक्क,संपत्तीवरील समान अधिकार, दत्तक घेण्याचा हक्क, घटस्फोट आणि पुनर्विवाहाचा कायदेशीर अधिकार, पती-पत्नी समानता इत्यादी. हिंदू कोड बिलावर तीव्र विरोध झाला; पण महिलांच्या समानतेवर बाबासाहेबांचा कटाक्ष कधीच ढळला नाही. अखेरीस त्यांनी न्यायशास्त्रातील तत्त्वांशी तडजोड करण्याऐवजी कायदामंत्रिपदाचा राजीनामा दिला. हा निर्णय त्यांच्या महिलावादी दृष्टीकोनाचा सर्वोच्च पुरावा आहे.

**6. आंबेडकरी स्त्रीचळवळ—कायद्यापलीकडची सामाजिक क्रांती**

बाबासाहेबांच्या प्रेरणेने 1920–1956 मध्ये महिला संघटनांचा मोठा विस्तार झाला.

रामाई, मुक्ताई सालवे, शांताबाई दाणी यांसारख्या कार्यकर्त्यांनी स्त्रियांना शिक्षण, रोजगार आणि आत्मसन्मानासाठी प्रोत्साहित केले.

थोडक्यात, बॅरिस्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांसाठीचे कायदेशीर कार्य हे केवळ सुधारकांचे नव्हे तर एका दूरदृष्टी असलेल्या न्यायतत्त्वज्ञाचे, मानवतावाद्याचे आणि क्रांतिकारक राष्ट्रनिर्मात्याचे कार्य होते. त्यांनी महिलांच्या हक्कांसाठी केलेल्या कायदेप्रक्रिया, सामाजिक आंदोलन आणि संविधानिक तत्त्वांमुळे भारतातील स्त्री-स्वातंत्र्याचा पाया भक्कम झाला. आज भारतीय स्त्रियांची वाढती प्रगती ही बाबासाहेबांच्या कायदेशीर संघर्षाची प्रत्यक्ष फलश्रुती आहे. त्यामुळेच त्यांचे योगदान सदैव प्रेरणादायी आणि दिशादर्शक राहील.

**डॉ. श्रेयसी परब**
**Dept. Of Commerce**



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर: एक अर्थशास्त्रज्ञ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे फक्त भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार नव्हते; तर ते एक दूरदृष्टी असलेले अर्थशास्त्रज्ञ ही होते. त्यांचे आर्थिक विचार हे सामाजिक न्याय, समानता आणि विकासाशी जोडलेले होते. वंचित आणि शोषित घटकांच्या उन्नतीसाठी अर्थव्यवस्थेने कसे काम करावे, हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अर्थशास्त्र विषयातील शैक्षणिक वाटचाल उल्लेखनीय होती. कोलंबिया विद्यापीठातील पीएचडी प्रबंध The Evolution of Provincial Finance in British India मध्ये त्यांनी भारतातील केंद्र–राज्य आर्थिक नात्याचे तत्त्व स्पष्ट केले. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील दुसऱ्या पीएचडीमध्ये त्यांनी The Problem of the Rupee लिहून रुपयाच्या स्थैर्यासाठी गोल्ड स्टँडर्डचे समर्थन केले आणि केन्सच्या मतांवर बौद्धिक प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांच्या प्रारंभिक लेखनात, विशेषतः Small Holdings in India, त्यांनी कृषीक्षेत्राच्या मर्यादा आणि औद्योगिकीकरणाची तातडी दर्शवली.

आर्थिक धोरणनिर्मितीतही त्यांचे योगदान ठळक जाणवते. सार्वजनिक वित्त, करप्रणाली, मौद्रिक धोरण, विनिमय दर, आणि केंद्र–राज्य आर्थिक रचना यांबद्दल त्यांनी स्पष्ट विचार मांडले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेशी संबंधित तत्त्वांवर त्यांनी प्रभाव टाकला. आर्थिक समानता ही राजकीय लोकशाहीचा पाया आहे, अशी त्यांची धारणा होती. औद्योगिकीकरण, रोजगारनिर्मिती आणि राज्य समाजवाद ही त्यांची मुख्य आर्थिक दिशा होती. तसेच कामगार कल्याणाच्या क्षेत्रात क्रांतिकारी सुधारणा करण्यातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. इंडिपेंडंट लेबर पार्टीची स्थापना, कामगारमंत्री म्हणून कारखाना कायदे, मातृत्व लाभ, कामाचे तास, बोनस, वेतन आणि सुरक्षेची तरतूद या सर्वांनी भारतीय कामगार क्षेत्राची पायाभरणी अधिक मजबूत केली. त्यांचे विचार आजही आर्थिक धोरणांना दिशा देतात आणि समानतेवर आधारित विकासाचा मार्ग दाखवतात.


**प्रा. डॉ. अनिल घोलप**
**(अर्थशास्त्र विभाग)**



## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा युवकांना सल्ला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी युवकांना नेहमीच शिक्षण, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा मजबूत आधार घ्यावा असा सल्ला दिला. त्यांच्या मते तरुणांनी प्रथम शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, कारण शिक्षण हेच खऱ्या मुक्तीचे आणि प्रगतीचे साधन आहे. त्यांनी युवकांना अंधश्रद्धा, जातिभेद आणि अन्यायाविरोधात उभे राहून विज्ञाननिष्ठ विचार स्वीकारण्याचे आवाहन केले. परिश्रम, प्रामाणिकपणा आणि सामाजिक जबाबदारी ही तरुणांची खरी ओळख असावी, असे ते सांगत. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून सतत स्वतःला घडवत राहणे, ही त्यांच्या संदेशातील मुख्य प्रेरणा होती. संघर्ष आला तरी खचून न जाता धैर्याने पुढे जाणे, समानता आणि मानवतेचे मूल्य जपणे, तसेच समाजहितासाठी काम करणे हे त्यांनी युवकांसाठी दाखवलेले मार्गदर्शन होते. युवकांनी उद्दिष्ट निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यासच देशाचा आणि स्वतःचा विकास शक्य आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मरण करताना...




०६ डिसेंबर १९५९ रोजी डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांचे निधन झाले. तो दिवस महापरीनिर्वाण दिन म्हणून डॉ. आंबेडकरांच्या कार्याचे स्मरण केले जाते. तसा हा दिवस दुःखाचा; पण महापुरुष मरत नसतात ते विचाराने जिवंत असतात. डॉ. आंबेडकरांचे कार्य हे मानव मुक्तीचे होते. त्यामुळे जोपर्यंत जातीव्यवस्था आहे, समाजात विषमता आहे, स्त्रीदास्य आहे तोपर्यंत बाबासाहेबांचा विचार जिवंत आहे. त्यामुळे आपल्याला सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांकडे जावे लागते. त्यांचे वैचारिक स्मरण करावे लागते. बाबासाहेबांना जाऊन आज ६९ वर्षे झाली. या काळात मोठे संशोधन त्यांच्यावर झाले. अनेक संशोधकीय पुस्तके, लेख, चरित्रे आली. नव्या अभ्यासकांनी अतिशय संशोधकीय पध्दतीने बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुस्तक रूपाने पुढे आणले. त्यातील गेल्या दोन-तीन वर्षातील इंग्रजी विचारविश्वातील काही निवडक लेखनाचा थोडक्यात आढावा महापरीनिर्वाण दिनाच्या निमित्ताने आपण घेणार आहोत.

त्यातील महत्त्वाचे पुस्तक म्हणजे आकाश सिंग राठोर यांचे आहे. Becoming Babasaheb: The Life and Times of Bhimrao Ramaji Ambedkar (1891-1929) हे त्याचे शीर्षक आहे. आकाश सिंग राठोर हे तत्वज्ञानाचे ख्यातनाम अभ्यासक आहेत. या पुस्तकात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडतानाचा प्रवास मांडला आहे. त्यासाठी त्यांनी व्यापक अभिलेखीय (Archival) संशोधन केले आहे. बाबासाहेबांच्या जन्मापासून ते महाडच्या चवदार तळ्याच्या संघर्षापर्यंतचा चरित्रात्मक आढावा राठोर यांनी घेतला आहे. बाबासाहेबांच्या चरित्राचा हा पहिला खंड आहे. दुसरा खंड लवकरच येणार आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्ये असे आहे की, बाबासाहेब प्रत्येक टप्प्यावर जे लेखन करत होते त्यावेळी ते काय विचार करत होते. त्यांचा त्यावेळी 'स्व'शी कोणता संघर्ष झाला. अनेकांनी बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचा आढावा घेतला पण एकूण बाबासाहेब घडतानाचा, त्यावेळीच्या त्यांच्या स्वअंतर्गत वैचारिक संघर्षाचा आढावा घेतला नाही. राठोर मात्र बाबासाहेबाच्या वैचारिक आणि बौध्दिक जडणघडणीचा तत्त्ववैचारीक आढावा घेतात.

दुसरे अलीकडील बाबासाहेबांवरील महत्त्वाचे पुस्तक डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी लिहिले आहे. त्याचे शीर्षक 'Iconoclast – A Reflective Biography of Dr. Babasaheb Ambedkar' असे आहे. Iconoclast याचा अर्थ मूर्तीभंजक, परंपरेविरुद्ध जाणारा, प्रस्थापित मातांना आव्हान देणारा असा होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रस्थापित व्यवस्था आणि अन्यायकारक परंपरांना तोडून टाकणारे होते. तेलतुंबडे यांना हाच अर्थ अभिप्रेत आहे. लेखकांनी या पुस्तकात बाबासाहेब यांच्या जीवनाची सात टप्प्यात मांडणी केली आहे. पहिला टप्पा हा १८९१ ते १९१८ हा असून यात भिवा ते भीमराव घडण्याचा प्रवास मांडला आहे. दुसरा टप्पा १९१९ ते १९२७ असून यात भीमराव ते बाबासाहेब अशी एक महान व्यक्तीची घडणघडणीचा प्रवास आहे. तिसरा टप्पा १९२८ ते १९३४ हा असून भारतातल्या संपूर्ण शोषितांना, दलितांना त्यांचा नेता मिळाला. चौथा टप्पा हा १९३५ ते १९४० असून यात बाबासाहेबांचा वर्ग संघर्षाचा आणि जातीअंताचा सबंध लढा त्यांनी मांडला आहे. १९४१ ते १९४६ या काळात एका मूर्तिभंजक/विद्रोहाचा महामेरू दूरदर्शी राजकारणी/नेता (statesman) कसा होतो याची मांडणी आहे. सहावा टप्पा १९४७ ते १९५१ असून यात स्वतंत्र भारतातील बाबासाहेबांचे कार्य आणि संविधान निर्मितीचा इतिहास मांडणी आहे. १९५२ ते १९५६ या काळातील बाबासाहेबांचे शेवटचे दिवस आणि बौद्ध धर्माचा स्वीकार याचे विश्लेषण आहे. अशा एकूण सात टप्प्यात बाबासाहेबांचे वैचारिक चरित्र तेलतुंबडे यांनी लिहिले आहे. शिवाय शेवटच्या प्रकरणात बाबासाहेबांच्या महापरीनिर्वाण झाल्यानंतर आजपर्यंत त्यांचे जे प्रतीकीकरण होत आहे त्याची चिकित्सक मांडणी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल कौतुक असणाऱ्या प्रत्येक अभ्यासाकाने वाचावे असे हे चरित्र आहे.

बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरीनिर्वाण दिनाचे औचित्याच्या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थी, संशोधक अभ्यासक यांनी आकाश सिंग राठोर आणि आनंद तेलतुंबडे लिखित चरित्राला वाचनीय भेट देणे हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी आदरांजली ठरेल.




**प्रा. शिवाजी मोटेगावकर**
**राज्यशास्त्र विभाग**

# रुपयाचे अधःपतन ते उपाय : आंबेडकरांची दूरद्दष्टी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ सामाजिक क्रांतिकारक नव्हते तर एक प्रगल्भ अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्या "The Problem of the Rupee: Its Origin and Its Solution" या ग्रंथाने भारताच्या चलनव्यवस्थेचे स्वरूप, त्रुटी आणि उपाय यांचा सखोल अभ्यास मांडला. ब्रिटिश काळात रुपया चांदीवर आधारित असल्याने, जागतिक बाजारातील चांदीच्या किंमतीतील घसरणीचा थेट परिणाम भारताच्या चलनावर होत होता. त्यामुळे रुपयाचे अवमूल्यन होत गेले आणि महागाई वाढत राहिली. आंबेडकरांनी दाखवून दिले की भारताची चलनव्यवस्था ब्रिटिशांच्या हितासाठी रचली गेली होती. मनमानी चलनछपाई, किंमतस्थैर्याचा अभाव आणि परकीय नियंत्रणे यामुळे भारतीय अर्थव्यवस्था कमकुवत बनली. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी काही महत्त्वपूर्ण उपाय सुचवले—

1. गोल्ड स्टँडर्डचा स्वीकार, जेणेकरून चलनाला स्थिर आधार मिळेल.
2. चलनव्यवस्थेचे स्वायत्त आणि वैज्ञानिक नियमन, ज्यासाठी स्वतंत्र केंद्रीय बँकेची गरज त्यांनी मांडली.
3. महागाई नियंत्रण आणि किंमतस्थैर्य, जे लोकांच्या क्रयशक्तीसाठी अनिवार्य आहे.

आंबेडकरांच्या याच विचारांच्या आधारे पुढे रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्थापन झाली. आजही रुपयाच्या विनिमय दरातील अस्थिरता, जागतिक बाजारातील चढउतार आणि महागाई अशा समस्या कायम आहेत. अशा वेळी आंबेडकरांची भूमिका अधिकच महत्त्वाची ठरते.
त्यांनी दिलेला मूलमंत्र स्पष्ट आहे—
चलनव्यवस्था ही उत्पादनक्षमता आणि राष्ट्रीय हित यांवर आधारित असली पाहिजे.
यामुळेच रुपया सबळ, स्थिर आणि जनहितकारी बनू शकतो. त्यांच्या दूरद्दष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेला आजही दिशा दाखवण्याचे कार्य सुरूच आहे.



**प्रा. गीतांजली हाके.**
**अर्थशास्त्र विभाग**

# बाबासाहेबांचे जलक्षेत्रातील योगदान :

जे महामानव द्रष्टे म्हणून ओळखले जातात त्यांचे कार्यक्षेत्र फक्त एकाच विषयापुरते मर्यादित राहात नाही. ते अनेक विषयात रममाण होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेमके या वर्गात मोडतात. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, धर्मकारण असे बाबासाहेबांच्या जीवनाचे विविध पैलू आपल्याला बघायला मिळतील. पाणी हा एवढा गंभीर विषय. तो बाबासाहेबांच्या नजरेतून कसा सुटू शकेल? गौतम बुद्धाचे तत्वज्ञानाचा विचार करतांना त्यांचा जलसंघर्ष बाबासाहेबांच्या नजरेत आला व पाणी हे विवादाचे कारण ठरु शकते हे त्यांच्या चाणाक्ष नजरेने हेरले. तिथपासून बाबासाहेबांनी पाण्यासंबंधी विचार करायला सुरवात केली आणि ते या क्षेत्रातील एक आघाडीचे तज्ज्ञ म्हणून पुढे आले. पाणी हा आर्थिक विकासाला चालना देणारा एक महत्वाचा घटक आहे हेही त्यांच्या लक्षात आले. भारताला वेगाने आर्थिक विकास साधायचा असेल तर पाण्याला सरकारच्या नियंत्रणाखाली आणावे लागेल यावर त्यांनी विचार मंथन केले. यातूनच पाण्याकडे बघतांना देशाची जलनिती, पाण्याद्वारे शेतीचा विकास, पाण्यावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्रिय जल आयोग, विकासाची नांदी ठरणारी दामोदर खोरे विकास यंत्रणेची उभारणी, पाण्यासंबंधी हक्क, समाजाला एकजिनसी बनवण्यासाठी महाडचा सत्याग्रह या सारख्या विषयांची हाताळणी त्यांचे कडून झाली. आपल्या देशात केंद्र सरकार, राज्य सरकार, इतर पाण्याचे क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती कार्य करीत होते. त्यांचेमधे सुसूत्रता नव्हती. हा सावळा गोंधळ थांबवणे गरजेचे होते. तो थांबवण्यासाठी संपूर्ण देशात पाण्यासंबंधात सुसूत्रता आणणारी एक संस्था उभारणे आवश्यक होते, सेंट्रल वॉटर कमिशनने ती गरज पूर्ण केली. अशा प्रकारची संस्था स्थापण्यासाठी जी दूरद्दष्टी लागते ती बाबासाहेबांजवळ होती. म्हणूनच हे काम होवू शकले.

आज आपण पाण्यासाठी कलह बघत आहोत. हा कलह विभागाविभागांमधे, राज्याराज्यांमधे, देशादेशांमधे असलेला आपण बघत आहोत. असा कलह आजच निर्माण झाला आहे का हो. नाही तो तर अनादी कालापासून चालू होता. खुद्द भगवान गौतम बुद्धांनीही तो अनुभवला होता. हा कलह थांबवायचा तर त्यासाठी कलह नियंत्रण यंत्रणा उभारली जावी ही कल्पना बाबासाहेबांच्या लक्षात आली. त्यासाठी त्यांनी सरळ कायदाच तयार केला. या कायद्यात ती यंत्रणा उभारण्यात आली आहे.

आपल्या देशाला जी जातीयतेची कीड पोखरत होती तिच्यावर देशात अनेक हल्ले करण्यात आलेत. पण ते विशेष प्रभावी ठरले नाहीत. पण बाबासाहेबांनी मात्र असा हल्ला केला की त्यामुळे संपूर्ण समाज ढवळून निघाला. या जातीयतेमुळे दलित समाजाला पाणी मिळणेही मुष्कील झाले होते. पाणवठ्याजवळ जाण्याचे स्वातंत्र्यही दलितांना नव्हते. पाण्यावर सर्व समाजाचा हक्क आहे हेही समाजाला मान्य नव्हते. अशा परिस्थितीत या प्रथेवर कडाडून हल्ला करायचा असे बाबासाहेबांनी ठरवले. आणि त्यातून निर्माण झाला महाड येथील चौदार तळ्यावरील सत्याग्रह. हा सत्याग्रह लाक्षणिक असला तरी त्याचे दूरगामी परिणाम झाले आणि आज कोणत्याही पाणवठ्यावरुन पाणी भरण्याचा हक्क संपूर्ण समाजाला प्राप्त झाला.
पाणी हे विकासाचे संसाधन आहे आणि त्यामुळे आर्थिक विकासाला गती येवू शकते ही बाब बाबासाहेबांनी हेरली. अमेरिकेतील टेनेसी व्हॅली अथॉरिटी सारखी व्यवस्था भारतात उभारली जावी यासाठी बाबासाहेबांचा प्रयत्न सुरु झाला. आणि त्यातून जन्मली दामोदर व्हॅली अथॉरिटीची संकल्पना. नद्यांची पूरप्रवणता नियंत्रणाखाली यावी, धरणे बांधून जमा झालेले पाणी शेती विकासासाठी वापरता यावे, त्याचबरोबर जलविद्युतही निर्माण केली जावी ही त्रिसूत्री या प्रकल्पाद्वारे उपलब्ध झाली. यालाच आज बहुउद्देशिय योजना या नावाने ओळखले जाते.
शेती हा अर्थव्यवस्थेचा पाया आहे, देशाचा विकास शेती विकासावर आधारलेला असतो, उद्योगांना कच्चा माल उपलब्ध करुन देणे हे शेतीविकासाचे उद्दिष्ट असावे अशी बाबासाहेबांची धारणा होती. शेतीचे तुकडे झाल्यामुळे शेती आर्थिक द्दष्ट्या परवडेनाशी झाली आहे, भारतातील पावसाळा बेभरवशाचा आहे, म्हणून शेतीविकासासाठी शेतीला पाणी पुरवठा योग्य पद्धतीने केला जावा याही प्रश्नांकडे बाबासाहेबांनी समाजाचे लक्ष वेधले.
बाबासाहेबांचे कार्यच एवढे मोठे आहे की त्याचे मूल्यमापन एका भारत रत्न पुरस्कारामुळे होवू शकत नाही. देशाच्या विकासाच्या द्दष्टीने पाणी प्रश्न हाताळला जाणे हाच एवढा मोठा विचार झाला की त्यासाठी आणखी एक स्वतंत्र भारत रत्न हा पुरस्कार त्यांना देणे जास्त योग्य ठरेल.

**डॉ. दत्ता देशकर**
**उपाध्यक्ष, PES**

# भारताचा उध्दारकर्ता.. महात्मा डॉ. बाबासाहेब आंबेडकर..-आचार्य प्र. के. अत्रे... !!

पाच हजार वर्षे हिंदू समाजाने सात कोटी अस्पृश्यांचा जो अमानुष छळ केला त्याला त्या समाजाकडून मिळालेले आंबेडकर हे बिनतोड आणि बंडखोर उत्तर होते. आंबेडकर म्हणजे बंड - मूर्तिमंत बंड. त्यांच्या देहातील कणाकणातून बंड थैमान घालीत होते. आंबेडकर म्हणजे जुलुमाविरुध्द उगारलेली वज्राची मुठ होय. आंबेडकर म्हणजे ढोंगाच्या डोक्यावर आदळण्यास सदैव तत्पर असलेली भीमाची गदा होय. आंबेडकर म्हणजे जातीभेदावर आणि विषमतेवर सदैव सोडलेलं सुदर्शन चक्र होय. आंबेडकर म्हणजे धर्ममार्तंडाच्या वर्णवर्चस्वाचा कोथळा फोडून त्यांची आतडी बाहेर काढणारे वाघनखे होय. आंबेडकर म्हणजे समाजातील वतनदार सत्ताधाऱ्यांच्या विरुध्द सदैव पुकारलेले एक युद्धाच होय. महात्मा फुले, कबीर आणि भगवान बुध्द हे तीन गुरूच मुळी आंबेडकरांनी असे केले कि, ज्यांनी देवाचे, धर्माचे, जातीचे आणी भेदांचे थोतांड माजविणाऱ्या समाज व्यवस्थेविरुध्द बंड पुकारले. पतित स्त्रियांच्या उध्दार करणाऱ्या महात्मा फुल्यांवर हिंदू समाजाने मारेकरी घातले. कबीराला हातपाय बांधून पाण्यात टाकण्यात आले. हत्तीच्या पायी देण्यात आले आणि मग तो मेल्यानंतर हिंदू - मुसलमानांना त्यांच्याबद्दल एवढे प्रेम वाटू लागले कि, त्याच्या प्रेताचा ताबा घेण्यासाठी ते एकमेकांचा खून करावयास सिद्ध झाले. बुध्दधर्माचा भारतातून उच्छेद करण्यासाठी भगवान बुद्धांच्या अनुयायांच्या कत्तली करण्यात आल्या. हाल, अपेष्टा आणि छळ यांचे हलाहल ज्यांना हयातीत आणि मेल्यानंतरहि प्राशन करावे लागले अशा बंडखोर गुरूंचे आंबेडकर हे सच्चे चेले होते. जुलूम आणि अन्याय म्हटला कि, आंबेडकरांच्या तळपायाची आग मस्तकात जाई. धमन्याधमन्यांमधून त्यांचे रक्त उसळ्या मारू लागे. म्हणूनच लोकसभेत पंडित नेहरूंनी बोलून दाखविल्याप्रमाणे हिंदू समाजाच्या प्रत्येक जुलुमाविरुध्द पुकारलेल्या बंडाचे ते प्रतिक बनले. हिंदू समाजाने आणि सत्ताधारी काँग्रेसने आंबेडकरांची जेवढी निंदा केली, जेवढा छळ केला, जेवढा अपमान केला तेवढा कोणाचाही केला नसेल. पण त्यां छळाची आणि अपमानाची त्यांनी लवमात्रही पर्वा केली नाही. धर्माच्या आणि सत्तेच्या जुलुमाला ते कधीही शरण गेले नाहीत. शरणागती हा शब्दच मुली आंबेडकरांच्या शब्दकोशात नव्हता. मोडेन, मार खाईन, मरेन पण वाकणार नाही; अशी त्यांची जिद्द होती आणि ति त्यांनी शेवटपर्यंत खरी करून दाखविली. जो धर्म तुम्हाला कुत्र्या मांजरा पेक्षाही हीन रीतीने वागवितो त्या धर्मात मी कधीही राहणार नाही, असे कोट्यावधी हिंदूंना ते कित्येक वर्षांपासून बजावत होते.

माणसासारख्या माणसांना अस्पृश्य मानणारी ति तुमची मनुस्मृती मी जाळून टाकणार आहे, असे त्यांनी सनातनी हिंदूंना छातीवर हात मारून सांगितले होते. त्यामुळे हिंदूधर्मीय लोक त्यांच्यावर फारच संतापले. त्यांना वाटले कि आंबेडकर हे गझनीच्या महंमद पेक्षाही हिंदुधर्माचे भयंकर दुश्मन आहेत. धर्मांतराची घोषणा केल्यानंतर आंबेडकरांचा खून करण्याची योजना घेऊन एक हिंदू पुढारी डॉ. कुर्तकोटी यांच्याकडे घेऊन गेले. तेव्हा कुर्तकोटीनी त्यांना सांगितले कि, आंबेडकरांना तुम्ही मारलेत कि त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबामधून १० आंबेडकर बाहेर पडतील. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा हि हिंदू धर्माच्या नाशाची घोषणा नव्हती. ते हिंदू धर्माच्या सुधारणेचे आव्हान होते. चातुर्वर्ण्याने हिंदू धर्माचा आणि हिंदुस्थानाचा नाश झाला असे आंबेडकरांचे मत होते. धर्मांतराच्या प्रश्नावर आमच्यापाशी बोलताना एकदा ते म्हणाले की, हिंदू धर्मावर मला सूड घ्यायचा असता तर पाच वर्षांच्या आत मी ह्या देशाचे वाटोळे करून टाकले असते; पण ह्या देशाच्या इतिहासात माझे नाव विध्वंसक म्हणून नोंदले जावे अशी माझी इच्छा नाही.!

हिंदूधार्माप्रमाणेच महात्मा गांधी आणि काँग्रेस यांच्यावर आंबेडकर नेहमी प्रखर टीका करीत असत. त्यामुळे जनाब जीनांप्रमाणेच साम्राज्यवाद्यांशी संगनमत करीत हिंदू स्वातंत्र्याचा मार्ग ते रोखून धरत आहेत अशी पुष्कळ राष्ट्रवादी लोकांची समजूत झाली होती. अस्पृश्यता निवारणाकडे बघण्याचा काँग्रेसचा दृष्टीकोन हा निव्वळ भूतदयावादी आणि भावनाप्रधान होता. आंबेडकर त्या प्रश्नाकडे न्यायाच्या आणि हक्काच्या दृष्टीने पाहत असत. पारतंत्र्य नष्ट करण्यासाठी ब्रिटिशांविरोधात जसे गांधीजींनी युध्द पुकारले तसे अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी स्पृश्य समाजाविरुध्द का पुकारू नये असा आंबेडकरांचा त्यांना सवाल होता. अस्पृश्यता निवारणा बाबत गांधीजी आणि आंबेडकर यांच्यात अशा तऱ्हेने मुलभूत मतभेद होते. म्हणून साम्राज्यशाहीविरोधी पातळीवर आंबेडकर आणि काँग्रेसची एकजूट होऊ शकली नाही. तथापि, गांधीजींच्या बद्दल मनात एवढी विरोधाची भावना असतांनाही केवळ त्यांचे प्राण वाचविण्यासाठी म्हणून अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची आपली मागणी मागे घेतली आणि पुणे करारावर सही केली. गोदशासारख्या एका ब्राह्मणाने गांधीजीचा प्राण घ्यावा आणि आंबेडकरांसारख्या एका महाराने गांधीजींचा प्राण वाचवावा ह्याचा अर्थ हिंदू समाजाला समजू नये याचे आम्हाला दुःख होते. पुणे करारावर आंबेडकरांनी सही करून गांधीजींचे प्राण वाचविले पण स्वतःचे आणि अस्पृश्य समाजाचे फार मोठे नुकसान करून घेतले. कारण ज्या उमद्या दिलाने आणि खेळाडू भावनेने आंबेडकरांनी पुणे करारावर सही केली तो उमेदपणा आणि खेळाडूपणा कॉंग्रेसने मात्र आंबेडकराशी दाखविला नाही. आपल्याला धार्जिण्या असलेल्या महारेत्तर अस्पृश्यांना हाताशी धरून काँग्रेसने आंबेडकरांचा आणि त्यांच्या अनुयायांचा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पराभव केला आणि देशाच्या राजनैतिक जीवनातून त्यांना उठवून लावले. आंबेडकर त्याबद्दल नेहमी विषादाने म्हणत कि, स्पृश्य हिंदूंच्या बहुमताच्या आधारावर माझे आणि माझ्या पक्षाचे जीवन गांधींनी आणि काँग्रेस ह्यांनी या देशातून नेस्तनाबूत करून टाकले.

नऊ कोटी मुसलमानांना खुश करण्यासाठी काँग्रेसने ह्या सुवर्णभूमीचे तीन तुकडे करून टाकले पण सहा कोटी अस्पृश्यांचे प्रेम मिळविण्यासाठी कागदी कायदे करण्यापलीकडे कॉंग्रेसने काहीही केले नाही. असे असताच देशाला स्वातंत्र्य मिळताच घटना समितीत अखंड हिंदुस्थानची आणि जातीय ऐक्याची प्रचंड गर्जना करून आंबेडकरांनी आपल्या विरोधकांना चकित करून टाकले. आंबेडकर म्हणाले, "जगातील कोणतीही सत्ता ह्या देशातील ऐक्याचे भंग करू शकणार नाही; आणि अखंड हिंदुस्थानातच आपले कल्याण आहे असे आज न उद्या मुसलमानांना कळून आल्यावाचून राहणार नाही.!" आंबेडकरांचे हे उद्गार त्यांच्या दैदीप्यमान देशभाक्तीचा ज्वलंत पुरावा होय. काँग्रेसशी पूर्वी असलेले सर्व वैर विसरून आंबेडकरांनी सहकार्यासाठी नेहरूंच्या हातात हात दिला आणि स्वतंत्र भारताची घटना तयार करण्याची जवाबदारी त्यांनी पत्करली. "मनुस्मृती जाळा" असे सांगणारे आंबेडकर भारतीय स्वातंत्र्याचे पहिले स्मृतिकार व्हावेत हा काय योगायोग आहे.! घटना तयार झाल्यानंतर त्यांनी हिंदू कोडबिल तयार करण्याचे महान कार्य हाती घेतले. पण काँग्रेसमधल्या सर्व प्रतिगामी आणि सनातनी शक्ती आंबेडकरांना विरोध करण्यासाठी एकदम बाहेर उफाळून आल्या. त्यामुळे आपल्या जागेचा राजीनामा देऊन मंत्रीमंडळातून बाहेर पडल्यावाचून आंबेडकरांना गत्यंतरच उरले नाही.

आंबेडकरांचे हिंदू कोड बिल जर मान्य झाले असते तर हिंदू समाजातील सर्व भेद अन्याय, विषमत नष्ट होऊन हिंदू समाज अत्यंत तेजस्वी आणि बलशाली झाला असता, आणि भारताच्या पाच हजार वर्षांच्या इतिहासात जी क्रांती आजपर्यंत कोणी घडवून आणली नाही ति घडून आली असती. पण दुर्दैव भारताचे, दुर्दैव हिंदू समाजाचे.! देवासारखा आंबेडकरांनी पुढे केलेला हात त्यांनी झिडकारला. राज्यकर्त्यांनी बहिष्कारले, हिंदू समाजाने लाथाडले, तेव्हा अखेर स्वःताचा आणि सात कोटी असहाय्य नी हीनदीन अनुयायांचा उध्दार कारणासाठी त्यांना मानवजातीला समतेचा, दयेचा आणि शांतीचा संदेश देणाऱ्या त्या परम कारुणिक बुध्दांना शरण जाण्यावाचून गत्यंतरच उरले नाही.

आंबेडकरांच्या विद्वत्तेबद्दल तर त्यांच्या शत्रूला देखील कधी संशय वाटला नाही. त्यांच्याएवढा प्रचंड बुद्धीमत्तेचा, विद्वत्तेचा आणि व्यासंगाचा एकही माणूस महाराष्ट्रात नव्हे तर भारतात या क्षणी नव्हता. रानडे, भांडारकर, तेलंग आणि टिळक यांच्या ज्ञानोपासानेची महान परंपरा चालविणारा महर्षी आज आंबेडकरांवाचून दुसरा कोण होता..? वाचन, चिंतन आणि लेखन ह्यावाचून आंबेडकरांना दुसरे जीवनच नव्हते. महार जातीत जन्माला आलेला माणूस विद्येच्या आणि ज्ञानाच्या बळावर एखाद्या प्राचीन ऋषीपेक्षाही श्रेष्ठ पदाला जाऊन पोहोचला होता. धर्मशास्त्रापासून ते घटनाशास्त्रापर्यंत असा कोणतीही एक कठीण विषय नव्हता कि ज्यामध्ये त्यांची बुद्धी एखाद्या गरुडासारखी वाट्टेल त्या उंचीपर्यंत विहार करू शकत नव्हती. तथापि, आंबेडकरांची धर्मावर आत्यंतिक निष्ठा होती, हि गोष्ट फार थोड्या लोकाना माहीत होती. आंबेडकर कितीही तर्ककर्कश आणि बुद्धिवादी असले तरीही त्यांचा पिंड धर्मनिष्ठेचा होता. भावूक आणि श्रद्धाळू पित्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला होता. शुचिर्भूत धार्मिक वातावरणात त्यांचे सारे बालपण गेले होते. सर्व धर्मांचा त्यांनी तौलानिक अभ्यास केला होता. आत्म्याच्या* उन्नतीसाठी धर्माची आवश्यकता असते असे त्यांचे ठाम मत होते. धर्मावरील त्यांच्या गाढ श्रद्धेमुळेच त्यांचे नैतिक चारित्र्य निरपवाद राहिले. त्यांना कसलेही आणि कोणतेही व्यसन नव्हते. त्यामुळेच त्यांच्या अंगात विलक्षण निर्भयता आणि आत्मविश्वास निर्माण झाला होता. आपण जे बोलतो, जे लिहितो ते खोटे आहे हे म्हणण्याची परमेश्वराची सुध्दा प्राज्ञा नाही, असा आवेश आणि आत्मबल त्यांच्या व्यक्तीमत्वात सदैव संचारलेला असे; अनेक वर्षांच्या अध्यात्मिक चिंतनाने आणि परिशीलनाने आंबेडकर शेवटी भगवान बुद्धांच्या चरणापाशी येऊन पोहोचले होते. बुध्दाला शरण गेल्याशिवाय केवळ अस्पृश्यांनाच नव्हे तर साऱ्या भारताला तरणोपाय नाही, असा आंबेडकरांचा ठाम निश्चय झाला होता. म्हणूनच तारीख १४ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे ५ लाख लोकांना बुध्द धर्माची दिक्षा दिली तेव्हा "सारा भारत बुध्दमय करेन" अशी गगनभेदी सिंहगर्जना त्यांनी केली. मुंबईतील १० लाख अस्पृशांना थोड्याच दिवसांनी ते बुध्दधर्माची दिक्षा देणार होते, पण अदृष्टात काही निराळेच होते.

अन्यायाशी आणि जुलुमाशी संबंध जन्मभर झगडून त्यांचे शरीर जर्जर झाले होते, दुर्बल झाले होते. विश्रांतीसाठी त्यांच्या शरीरातला कण न कण असुसलेला होता. भगवान बुद्धांच्या करुणेचा जेव्हा त्यांना अखेरचा आसरा मिळाला तेव्हा त्यांच्या अंतःकरणात जळणारा वन्ही शीत झाला. आपल्या कोट्यावधी अनुयायांना आता आपण उध्दाराचा मार्ग दाखवून ठेवला आहे, आता आपले अवतारकार्य संपले, अशी त्यांना जाणीव झाली आणि निद्रामाउलींच्या मांडीवर डोके ठेवून अत्यंत शांत आणि तृप्त मनाने त्यांनी आपली प्राणज्योत निर्वाणात कधी विलीन करून टाकली त्याचे जगाला दुसरे दिवशी सकाळी ते जागे होईपर्यंत गंधवार्ता सुध्दा लागली नाही.

"मी हिंदू धर्मात जन्माला आलो त्याला माझा नाईलाज आहे; पण मी हिंदूधर्मात कधीही मारणार नाही." हि आंबेडकरांची घोषणा हिंदूधर्माविरूध्द रागाची नव्हती, सुडाची नव्हती. झगडा करून असहाय्य झालेल्या विनम्र आणि श्रध्दाळू साधकाचे ते तळमळीचे उद्गार होते. आंबेडकरांचे चरित्र ही एका शूर आणि बंडखोर समाजसुधारकाची वीरकथा आहे, शोककथा आहे. गरिबांनी, दीनांनी आणि दलितांनी हि रोमहर्षक कथा वाचून स्फूर्ती घ्यावी आणि आंबेडकरांचा ज्यांनी जन्मभर छळ आणि उपहास केला त्या प्रतिगामी राज्यकर्त्यांनी आणि सनातनी हिंदूंनी त्यांची हि शोककथा वाचून आता पश्चात्तापाने अवनमस्तक व्हावे. आंबेडकरांच्या जीवनावर आणि कार्यावर जसजसा प्रकाश पडेल तसतसे त्यांचे अलौकिकत्व प्रकट होईल आणि आंबेडकर हे हिंदू समाजाचे शत्रू नसून उध्दारकर्तेच होते अशी भारताची खात्री पटेल. भारतीय जीवनात जे जे काही उज्वल आणि उदात्त आहे त्याचे आंबेडकर हे एक ज्वलंत भांडार होते. आंबेडकर हा स्वाभिमानाचा एक जळता ज्वालामुखी होता. भारताच्या ऐक्याचे आणि महाराष्ट्राच्या ऐक्याचे ते महान प्रणेते होते. महाराष्ट्र आणि मुंबई ह्यांचे नाते जे देवाने जोडले आहे, ते कोणाच्या बापालाही तोडता येणार नाही असे ते म्हणत.

बाबांचे कोणकोणते गुण आता आठवायचे आणि त्यांच्या कोणकोणत्या गुणांचे स्मरण करावयाचे ? सात कोटी अस्पृश्यांवरचे तर आता आभाळच फाटले आहे. भगवान बुद्धांखेरीज त्यांचे समाधान कोण करू शकणार..? आणि त्यांच्या डोळ्यातील अश्रू तरी कोण पुसणार..? त्यांनी ध्यानात धरावे कि, भारताच्या इतिहासात आंबेडकर आणि त्यांचे कार्य अमर आहे. त्यांनी जो मार्ग आखला आणि प्रकाश दाखविला त्याच्याच अनुरोधाने जाऊन त्यांच्या कोट्यावधी अनुयायांनी आपला उध्दार करून घ्यावा. आंबेडकरांच्या प्रत्येक अनुयायांचे हृदय हे त्यांचे जिवंत स्मारक आहे. म्हणून आंबेडकरांची विद्वत्ता, त्यांचा त्याग, त्यांचे चरित्र्य आणि त्यांची निर्भयता प्रत्येकाने जर आपापल्या जीवनात निर्माण करण्याचा जर आटोकाट करण्याचा प्रयत्न केला तरच आंबेडकरांचे अपूर्ण राहिलेले कार्य पूर्ण होईल आणि साऱ्या भारताचा उध्दार होईल. तीन कोटी मराठी जनतेच्या वतीने व्याकुळ हृदयाने आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी आम्ही आंबेडकरांना अभिवादन करतो..

-आचार्य अत्रे..



Ref-आचार्य प्रल्हाद केशव अत्रे
यांचा दैनिक "मराठा" मध्ये
दिनांक ०७-१२-१९५६ रोजी
प्रकाशित झालेला लेख